# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.05.2025** **वार-गुरुवार**

---

<u>पंतप्रधान</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानमध्ये बिकानेर इथून दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून देशातल्या १८ राज्यांमधल्या १०३ अमृत रेल्वे स्थानकांचं उद्घाटन केलं. यात पुणे विभागातील केडगांव आणि लोणंदसह महाराष्ट्रातल्या १५ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. विकसित भारताच्या निर्माणासाठी देशभरात आधुनिक पायाभूत सुविधांवर मोठ्या प्रमाणात काम सुरु असल्याचं पंतप्रधान यावेळी म्हणाले. देशातील रस्ते, विमानतळ, रेल्वे आणि रेल्वेस्थानकं आधुनिक करण्यात येत असून सरकार एकाच वेळी देशातल्या तेराशे रेल्वे स्थानकांना अमृत भारत योजनेअंतर्गत आधुनिक स्वरुप देत असल्याचं पंतप्रधानांनी यावेळी सांगितलं.

<u>सामंत</u>

महाराष्ट्र हे उद्योगांना प्रोत्साहन देणारं राज्य असून सुमारे १५ लाख ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक राज्य शासनाने आणली आहे, असं प्रतिपादन उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज पुण्यात चाकण इथं केलं. चाकण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांच्या समस्या सोडवण्यासाठी राज्य शासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करेल अशी ग्वाही त्यांनी दिली. चाकण इथल्या उद्योगांच्या समस्यांबाबत सर्व संबंधित शासकीय विभाग आणि उद्योग संघटनांसमवेत आयोजित बैठकीत ते बोलत होते. मोठ्या उद्योगांबरोबच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना प्रोत्साहन म्हणून मोठ्या प्रमाणात सवलती देण्याचे राज्य शासनाचे धोरण आहे,

असं सामंत महाणले. यावेळी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सामंत यांनी उद्योग प्रतिनिधींच्या वीज, पाणी, वाहतूक कोंडी, रस्त्यांची स्थिती आदींबाबतच्या समस्या जाणून घेतल्या.

<u>नियुक्ती</u>

पुणे महापालिकेच्या आयुक्तपदी पंतप्रधान कार्यालयातील उपसचिव नवल किशोर राम यांची नियुक्ती करण्यात आली आहे. 31 मे रोजी सध्याचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले सेवानिवृत्त होत असल्याने ही नियुक्ती करण्यात आली आहे. नवल किशोर राम यांनी यापूर्वी पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून काम पाहिले आहे.

<u>Pcmc</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने गेल्या महिन्यापासून कागदविरहित प्रशासनाकडे वाटचाल सुरू केली आहे. महानगरपालिकेत दस्तऐवज व्यवस्थापन प्रणालीमध्ये १ एप्रिलपासून ३१ हजारांहून जास्त कागदपत्र आणि ३ हजार ७१६ फाईल्सचं डिजिटलाजेशन पूर्ण झालं आहे. याशिवाय सॅप प्रणाली आणि विविध नागरी तसंच प्रशासकीय ॲप्लिकेशन्सच्या वापरामुळे महानगरपालिकेचं कामकाज अधिकच वेगवान झालं आहे. महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांचं वेतन आणि ठेकेदारांची देयकं काढण्यासाठी आता सॅप प्रणालीचा वापर केला जात आहे. विवाह नोंदणी, क्रीडा मैदानं आणि सभागृह नोंदणी यासारख्या नागरी सेवा देखील आता डिजिटल झाल्या आहेत.

<u>सावलीकेंद्र</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत सुरू केलेलं 'सावली' हे बेघर निवारा केंद्र, राज्यामध्ये सर्वोत्कृष्ट ठरलं आहे. राज्यस्तरीय निवारा सनियंत्रण समितीने नुकत्याच केलेल्या निरीक्षणानंतर राज्यातील सर्वोत्कृष्ट ५ निवारा केंद्रांची निवड केली असून, त्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सावली बेघर निवारा केंद्र प्रथम क्रमांकावर आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत २०१९मध्ये १५२ बेघर आढळून आले. त्यानंतर दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियाना अंतर्गत ऑक्टोबर २०२०मध्ये सावली निवारा केंद्र सुरू करण्यात आलं. पिंपरीतील भाजी मंडईच्या पहिल्या मजल्यावर १९ हजार ८६ चौरस फूट जागेवर हे केंद्र उभारण्यात आलं असून याची निवास क्षमता १११ आहे. या केंद्रामध्ये स्वच्छता, आरोग्य तसंच सुरक्षा या मुद्द्यावर विशेष भर देण्यात आला असून अन्य विविध सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कचराडेपो आरक्षण

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि नागरीकरणामुळे कचऱ्याची समस्या गंभीर होत असल्याने महापालिकेने पुनावळे येथील वन विभागाच्या जागेवर २००८ मध्ये टाकलेले कचरा डेपोचे आरक्षण स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींच्या तीव्र विरोधामुळे रद्द केले आहे. या जागी व्यावसायिक गाळे, सुविधा केंद्र उभारण्याचे आरक्षण नवीन विकास आराखड्यात टाकण्यात आलं आहे.

**चिकुनगुन्या**

राज्याच्या विविध भागात गेल्या काही दिवसात झालेल्या पावसानंतर आता काही जिल्हा आणि महापालिका हद्दीत चिकुनगुन्याच्या रुग्णसंख्येत वाढ झाल्याचं दिसून येत आहे. डेंग्यू आणि चिकुनगुन्याच्या निदानासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि जिल्हा रुग्णालयातील तपासणी केंद्रात रक्त नमुने मोफत तपासले जातात. डासांमुळे होणारे हे आजार रोखण्यासाठी नागरिकांनी घरातील पाण्याच्या टाक्या, भांडी आठवड्यातून एकदा कोरडी करून स्वच्छ करावीत, असं आवाहन आरोग्य विभागाच्या सहसंचालक डॉ. बबिता कमलापूरकर यांनी केलं आहे.

<u>जलतरण</u>

पुणे जिल्हा हौशी जलतरण संघटनेच्या वतीने रमेश दमले स्मृती जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत डेक्कन जिमखाना संघाने 1 हजार 171 गुण मिळवत सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं. हार्मनी ॲक्वाटिक क्लबने दुसरा तर चॅम्पियन्स ॲक्वाटिक क्लबने तिसरा क्रमांक मिळवला. यंदाच्या जिल्हास्तरीय स्पर्धेत नवीन 32 विक्रमांची नोंद करण्यात आली. शुभम धायगुडे, सलील भागवत, युवराज तिडके, निमिष करडे, निधिष सोनवणे यांनी नवे विक्रम केले.

<u>हवामान</u>

पुणे शहर आणि परिसरात आजही दुपारनंतर पावसाला सुरुवात झाली आहे. गेले दोन दिवस शहरात संध्याकाळनंतर जोरदार पाऊस पडत आहे. उद्याही दिवसभर ढगाळ हवामान असेल आणि दुपारनंतर हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**